ePaper
| वर्ष - 7 । अंक - 153 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 10 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पाचपैकी 3 राज्यांत काँग्रेस देणार भाजपाला धोबीपछाड!




## आतील पानांत

- न्यूझीलंडचा दुसरा विजय!
- साऊथच्या चित्रपटांना 'गणपथ'चं चॅलेंज!
- 5 राज्यांतील निवडणुका जाहीर!
- मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला?

## चिखलीतील विकास सानेंचा महापालिकेवर मोर्चा!

# अजित पवार गटाला घरचा आहेर!

### सत्तेत असतानाही समस्या सुटेनात : सत्ताधारी पक्षातील इच्छुकांकडून नागरिकांची दिशाभूल?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार सहभागी झाले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनावर राज्य सरकारचे पूर्ण नियंत्रण आहे. विशेष म्हणजे, पालकमंत्रीपदही अजित पवार गटाकडे आहे. असे असतानाही चिखली आणि परिसरातील पायाभूत सोयी-सुविधांसाठी विकास साने यांच्या नेतृत्त्वाखाली महापालिकेवर आज आंदोलन करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादी (अजित पवार गट) सामान्य नागरिकांची दिशाभूल करीत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



चिखली आणि परिसरातून सामाजिक कार्यकर्ते विकास साने हे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आगामी महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. चिखलीतील पायाभूत सोयी-सुविधांसाठी त्यांनी यापूर्वीही आंदोलनात्मक पवित्रा घेतलेला आहे. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून अजित पवार महायुतीत सहभागी झाले असून, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि आता पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यामुळे अजित पवार यांच्याकडे प्रशासकीय सूत्रे एकवटली असून, शहरातील प्रलंबित प्रश्नांबाबत यापूर्वी दोन-तीन बैठकाही झालेल्या आहेत.

अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचे निकटवर्ती म्हणून विकास साने यांची ओळख आहे. पालकमंत्रीपदी अजित पवार यांनी निवड झाल्यानंतर "शहरातील विकासकामांना गती मिळेल" असा दावा अजित गव्हाणे यांनी केला होता. मग, विकास साने यांना आंदोलन करण्याची वेळ का आली? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी आंद्रा, भामा आसखेड आणि आता पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र, चिखलीत पाणी पुरवठ्याचा मुद्दा पुढे करीत विकास साने यांना आंदोलन करावे लागते, ही बाब राष्ट्रवादी अजित पवार गटासाठी आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

#### महाविकास आघाडीच्या काळात काय केले?

पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे २० वर्षे राष्ट्रवादीची सत्ता राहिली आहे. त्यावेळी शहरातील विकासकामांची सर्व सूत्रे अजित पवार यांच्याकडेच होती. २०१९ मध्ये महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या सत्ताकाळातही राष्ट्रवादीकडे निर्विवाद सत्ता होती. असे असतानाही समाविष्ट गावे आणि पिंपरी-चिंचवडमधील प्रश्न मार्गी लागले नाही. आता महायुती सरकारच्या काळात अजित पवार यांच्या माध्यमातून राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना नागरी प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर नागरिकांनी दाद कोणाला मागायची? असा प्रश्न आहे.

## नेहरूनगर येथील वाघिरे टॉवर्स सोसायटीधारकांचा प्रश्न सुटला!

### ड्रेनेज लाईन, काँक्रिटीकरणाचे काम सुरु; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नेहरुनगर येथील वाघिरे टॉवर्स सोसायटीच्या रस्त्यावरील काँक्रेटिकरण आणि ड्रेनेजलाईचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे परिसरातील सुमारे दीड हजार रहिवाशांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे स्थानिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार हे काम हाती घेण्यात आले. त्याचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. यावेळी वाघिरे टॉवर्स सोसायटीचे चेअरमन तुषार वाघिरे, सामाजिक कार्यकर्ते फारुक इनामदार, अशोक देशमुख, जावेद इनामदार, विजय जमदाडे, अजय जुनावणे, सचिन शिंदे, मंगेश कुलकर्णी आदी स्थानिक नागरिक उपस्थित होते.

तुषार वाघिरे म्हणाले की, वाघिरे टॉवर्स नेहरूनगर सोसायटी मधील काँक्रिटीकरण आणि अंतर्गत संपूर्ण ड्रेनेज लाईनच्या कामाचे भूमिपूजन करण्यासाठी आमदार लांडगे यांना विनंती करण्यात आली होती.

या सोसायटीमध्ये सुमारे १३० सदनिका आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून सोसायटीधारकांना विविध पायाभूत सोयी-सुविधांच्या समस्या होत्या. त्याबाबत आमदार लांडगे यांनी सकारात्मक पुढाकार घेतला आहे. काँक्रिटीकरण आणि ड्रेनेजलाईनचे काम महिन्याभरात पूर्ण होईल. आमदार लांडगे यांच्या माध्यमातून नेहरुनगर, उद्यमनगर, अजमेरा या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत.

> "भोसरी विधानसभा मतदार संघातील सोसायटीधारक, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही कायम प्राधान्य दिले आहे. सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आम्ही नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात केली होती. त्यामुळे सोसायटीधारकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून पूर्णवेळ अधिकारी नियुक्त केला आहे. नागरी समस्यांबाबत सोसायटीधारकांनी 'परिवर्तन हेल्पलाईन-93799 09090' वर संपर्क करावा आणि आपली तक्रार नोंदवावी. त्या सोडवण्यासाठी आम्ही तत्पर आहोत.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा,

# गुन्हेगारांना मिळतोय राजाश्रय!

## रुग्णसेवेच्या नावाखाली रुग्णालय गुन्हेगारांचा अड्डा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'ससून रुग्णालय हे आरोग्य सेवा देणारे रुग्णालय आहे की गुन्हेगारांचा अड्डा, असा प्रश्न पडला आहे. रुग्णसेवेच्या नावाखाली रुग्णालय गुन्हेगारांचा अड्डा बनले आहे. याला जबाबदार कोण? गंभीर स्वरूपाचे आरोप असलेले आरोपी तेथे आहेत.**

हे आरोपी बिनधास्तपणे बडदास्त घेत आहेत. ड्रग्ज माफिया, मटका किंग सगळेच रुग्णालयात मजा मारत असून आपले धंदे चालवत आहेत. याला पोलिस किंवा डॉक्टर जबाबदार असतील का? हे सर्व करण्याची हिंमत राजकीय राजाश्रयाशिवाय शक्य नाही. या राज्यात गुन्हेगारांना राजाश्रय मिळत आहे. सरकारने या प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) त्वरित चौकशी करावी,' अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. पुणे दौऱ्यावर आलेले असताना वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ससून रूग्णालयातील गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान राजकारणाबद्दल बोलताना ते म्हणाले,"एकमेकांशी वैचारिक लढाई यापूर्वीच्या राजकारणात होती, परंतु आताच्या राजकारणात बदलाची भावना आहे. वैचारिक लढाई ही



वैयक्तिक झाली आहे. देशात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूका जाहीर झाल्या असून या राज्यांमध्ये काँग्रेस भक्कम आहे. तर काही राज्यांमध्ये काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष अशी थेट लढाई आहे. त्यात आताच्या सर्वेक्षणानुसार पाचही राज्यात काँग्रेस बहुमताने येईल, असा विश्वास वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. तसेच, लोकसंख्येनुसार बार्टीची आर्थिक तरतूद असावी, जातीनिहाय जनगणनेसाठी गरजेची असेही त्यांनी अधोरेखित केले. वडेट्टीवार म्हणाले, 'केंद्र सरकारने एकीकडे दारूला करमुक्त केले आहे. तर दुसरीकडे अन्नधान्यावर वस्तू व सेवा कर (जीएसटी) लावला आहे. इंग्रजापेक्षाही खालच्या स्तरावर केंद्र सरकार जात आहे.' शिवसेनेच्या अपात्र आमदारांबाबतच्या निर्णयाला

### सरकारी तिजोरीची लुट सुरु

» 'चंद्रपूर असो किंवा पुणे येथील पोटनिवडणूक होत नाही, कारण या दोन्ही ठिकाणी भाजपला सपशेल पराभव दिसत होता. भाजपने केलेल्या चार वेगवेगळ्या सर्वेक्षणातून त्यांचा पराभव निश्चित होता. त्यामुळे दोन्ही निवडणूका पुढे ढकलण्यात आल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. 'मुख्यमंत्रीपद, पालकमंत्रीपद, उपमुख्यमंत्रीपद कोणाला द्यायचे! एक 'दादा' दुसऱ्या 'दादा'वर वरचढ ठरतोय, हे सध्याचे राज्याचे राजकारण आहे. हे राजकारण राज्याचा सत्यानाश करण्यासाठी सुरू आहे. आताच्या काळात प्रचंड निविदा काढल्या जात आहेत. त्यातून सरकारी तिजोरीची प्रचंड लूट सुरू असून वस्तादांची टोळी राजरोजसपणे सरकारी तिजोरी लुट करत आहे.'

दिरंगाई होत असल्याबाबत ते म्हणाले, 'शिवसेनेच्या आमदारांविरोधात निर्णय असणार आहे किंवा कायद्याच्या चौकटीत हे आमदार अपात्र ठरतील, अशी भीती असल्यामुळे निर्णय घेण्यास विलंब लावला जात आहे.' 'विरोधी पक्ष म्हणून कंत्राटी नोकरभरतीच्या विरोधात यापूर्वी आवाज उठविला आहे. हा निर्णय आरक्षण आणि गुणवत्तेच्या मुळावर उठणारा आहे. कंत्राटी नोकरभरतीचा निर्णय रद्द करावा, ही मागणी लावून धरली आहे. शाळांचे खासगीकरण आणि महाबळेश्वरमधील ग्रामीण रुग्णालयाचे खासगीकरणाला विरोध आहे, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

# निवडणुका विचारांवर लढल्या जातील : जयंत पाटील

## डॉ. अशोक शिलवंत यांच्या स्मृती प्रित्यर्थ विविध पुरस्कारांचे वितरण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुढील निवडणुका फसव्या विकासाच्या मुद्द्यांवर न होता, विचारांवर लढल्या जातील. आता सामान्य माणूस योग्य विचार करूनच निर्णय घेतील. सध्या परिस्थिती अवघड असली तरी मतदार राजा विवेक बुद्धीने निर्णय घेईल असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी पिंपरी येथे केले.**



सोमवारी पिंपरीतील आचार्य यात्रे रंगमंदिर येथे अशोक सार्वजनिक विकास सोसायटीच्या वतीने आयोजित केलेल्या स्मृतीशेष डॉ. अशोक शीलवंत यांच्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन व पुरस्कार वितरण सोहळ्यात जयंत पाटील बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस खासदार श्रीनिवास पाटील, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, कार्यक्रमाच्या संयोजिका, माजी नगरसेविका डॉ. सुलक्षणा शीलवंत - धर, ज्येष्ठ नेते प्रकाश म्हस्के, ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा, माजी महापौर कवीचंद भाट, राजरतन भंते, माजी नगरसेवक माई काटे, मुक्ता पडवळ, बबन गाढवे, मोहम्मद भाई पानसरे, मारुती भापकर तसेच ॲड. राजरत्न शिलवंत, पुरस्कार विजेते माजी आमदार जयदेव गायकवाड, संपादक संजय आवटे, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, भाऊसाहेब डोळस, चंद्रकांत शेटे, स्वाती सामक आदी उपस्थित होते. यावेळी जयंत पाटील यांनी सांगितले की, सम्राट अशोक यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम डॉ. अशोक शिलवंत यांनी केले आहे .मणिपूरच्या हिंसक घटना पाहता आमचा शिक्षणाचा पाया कमकुवत आहे असे वाटते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या एका मताची किंमत दाखवून दिली आहे. या एका मताने देशाची सत्ता बदलता येते हे आता सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत देशात लोकशाही टिकवण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाने, सुजाण मतदारांनी योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे. पुढील निवडणुका फसव्या विकासावर न होता विचारांवर होतील. आता सामान्य माणूस योग्य विचार करूनच निर्णय घेतील असेही जयंत पाटील यांनी सांगितले. खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले की, मिळवणं आपल्यासाठी असते तर जुळवनं समाजासाठी असते, असे नेहमी समाजासाठी

### मतदारांनी योग्य निर्णय घेण्याची वेळ

» सम्राट अशोक यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम डॉ. अशोक शिलवंत यांनी केले आहे. मणिपूरच्या हिंसक घटना पाहता आमचा शिक्षणाचा पाया कमकुवत आहे असे वाटते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या एका मताची किंमत दाखवून दिली आहे. या एका मताने देशाची सत्ता बदलता येते हे आता सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत देशात लोकशाही टिकवण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाने, सुजाण मतदारांनी योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे. पुढील निवडणुका फसव्या विकासावर न होता विचारांवर होतील. आता सामान्य माणूस योग्य विचार करूनच निर्णय घेतील असेही जयंत पाटील यांनी सांगितले.

जुळवण्याचे काम डॉ. अशोक शीलवंत यांनी केले आहे. त्यांचा वारसा त्यांची कन्या डॉ. सुलक्षणा आणि पुत्र राजरतन करीत आहेत याचा निश्चित अभिमान आहे.

यावेळी संत तुकाराम नगर मधील गुणवंत विद्यार्थ्यांना आणि शहरातील विविध सामाजिक संस्था ट्रस्ट यांना आर्थिक मदतीचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.श्रीपाल सबनीस यांनी सांगितले की, विश्वशांतीचा विचार शेवटच्या क्षणापर्यंत डॉ. अशोक शीलवंत यांनी रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांचा परिवार काम करीत आहे. त्यांचे व्यक्तिमत्व सात्विक राजकारण, समाजकारण धर्मकारण करणारे होते. सर्व महापुरुषांच्या संचितांचे बीज अशोक शिलवंत यांच्यामध्ये मला जाणवतात. स्वागत, प्रास्ताविक सुलक्षणा शीलवंत - धर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिलीप कांबळे आभार ॲड. राजरत्न शीलवंत यांनी मानले.

# तयारी लोकसभेची: मावळ मतदार संघात मोर्चेबांधणी

# बावनकुळे उद्या पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर!

## भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांची पत्रकार परिषदेत माहिती

### "महाविजय 2024" घर चलो अभियान शहरात सक्षमपणे राबविणार



। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभेची निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने 'महाविजय- २०२४' अभियान सुरु केले आहे. महाराष्ट्रातून महायुतीला ४५ पेक्षा जास्त जागा मिळाव्यात, असा निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून मावळ लोकसभा प्रवास दौरा, घर चलो अभियानाच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पिंपरी-चिंचवडचा दौरा करणार आहेत, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली.**

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दि. ११ ऑक्टोबर २०२३ रोजी पिंपरी-चिंचवडचा दौरा नियोजित केला आहे. याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत शहराध्यक्ष जगताप बोलत होते. यावेळी, विधानपरिषद आमदार उमाताई खापरे, चिंचवड विधानसभा आमदार आश्विनीताई जगताप, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळुराम बारणे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष अमित गोरखे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाताताई पालांडे, भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस अनुप मोरे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, अजय पाताळे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, उपाध्यक्ष माऊली थोरात यांच्यासह भाजपा पदाधिकारी – कार्यकर्ते उपस्थित होते. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षातर्फे राज्यात निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. त्यानुसार, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला जात आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचा राज्यभरातील संपूर्ण ४८ लोकसभा मतदारसंघांचा दौरा सुरू आहे. त्याअनुषंगाने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचे बुधवारी सायंकाळी ४ वाजता किवळे-मुकाई चौक येथे आगमन होवून त्यांचे शहर भाजपा, महिला मोर्चा व युवा मोर्चाच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात येईल.

### 'भाजपा वॉरियर्स'शी साधणार संवाद...

पिंपरी-चिंचवड येथे मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघातील 'भाजपा वॉरियर्स' शी संवाद साधणार आहेत. यानंतर सायंकाळी ६ वाजता 'घर चलो अभियान' अंतर्गत पिंपरी, राधिका चौक येथून अभियानाला सुरुवात होईल. त्यानंतर, शगुन चौक व साई चौक परिसरातील नागरिकांची भेट घेतील. त्यांना पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाच्या ९ वर्षातील लोकोपयोगी योजनांची माहिती देतील. या ठिकाणी त्यांच्या 'रोड शो'चे आयोजन देखील करण्यात आले असून, यामध्ये दुर्लक्षित झालेल्या व बलुतेदार असलेल्या कारागिर – शिल्पकार यांना विकसीत करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने हाती घेतलेल्या पी एम विश्वकर्मा योजनेची माहिती देण्यात येणार आहे. साई चौक येथे नागरिकांना संबोधून भाषणाने कार्यक्रमाचा समारोप होईल.

" प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार, मावळ लोकसभा मतदार संघातील भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठका घेण्यात येत आहे. या बैठकीत भाजपाचे 'महाविजय-२०२४' संदर्भात चर्चा करण्यात येत आहेत. त्यासाठी मावळ लोकसभा मतदार संघातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, वॉरिअर्स, बूथप्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, घराघरांत पोहचणार आहे. लोकसभा निवडणुसाठी भाजपा सज्ज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात पुन्हा एकदा भाजपा महायुती सरकार स्थापन होईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.
शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

- शंकर जगताप,
जिल्हा पुरवठा अधिकारी

# नवरात्रोत्सवातील मंडप भाडे रद्द करा : राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष शेखर काटे

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना मागणीचे निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवरात्रोत्सव उत्साहाचा सण आहे. या उत्सवानिमित्त शहरात उभारण्यात येत असलेल्या पत्राशेड, मंडपाचे भाडे महापालिका प्रशासनाकडून वसूल केले जाते. मात्र, गणेशोत्सवाप्रमाणे नवरात्रोत्सवातही मंडप भाडे माफ करावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष श्री. अजित गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आयुक्त श्री. शेखर सिंह यांना याबाबत निवेदन देण्यात आले. या वेळी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेविका माया बारणे, राष्ट्रवादी युवकचे कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, पदाधिकारी रोहीत काटे उपस्थित होते.

निवेदनात नमूद केले आहे की, नुकताच गणेशोत्सव उत्साहात पार पडला. गणेशोत्सवात शहरातील सर्व गणेश मंडळांनी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन केले. त्यामुळे गणेशोत्सवात कोणतेही गालबोट लागले नाही. सणही आनंदात साजरा करण्यात आला.

### रेल्वे स्थानकाच्या परिसराचे सुशोभीकरण

**गणेशोत्सवात शासनाकडून देखील सहकार्य करत काही गोष्टींमध्ये सवलत देण्यात आली होती. आगामी नवरात्र उत्सवात शासनाकडून सहकार्य मिळावे अशी शहरातील मंडळाची अपेक्षा आहे. उत्सवानिमित्त शहरात उभारण्यात येत असलेल्या पत्राशेड, मंडपाचे भाडे महापालिका प्रशासनाकडून वसूल केले जाते. मात्र, गणेशोत्सवाप्रमाणे नवरात्रोत्सवातही मंडप भाडे माफ करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.**

# ‘लिव्ह इन’ की ‘लग्न’ उत्तर कसं शोधणार?




**‘लिव्ह इन’ अर्थात लग्नाशिवाय शारीरिक संबंधात राहण्याबाबत पुन्हा एकदा चर्चा होऊ लागल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २०१० मध्ये दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयात लिव्ह इन रिलेशनला मान्यता दिली होती. पण काही दिवसांपूर्वी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या विधानाने ‘लिव्ह इन’ पुन्हा चर्चेत आलंय. विवाह संस्थेत जोवर असमानता आणि जाचकता आहे, तोवर या चर्चेला अंत नाही.**



अलाहाबाद उच्च न्यायालयाने ‘लिव्ह इन’ अर्थात लग्नाशिवाय शारीरिक संबंधांमध्ये राहण्याच्या अलीकडील काळात वाढत चाललेल्या प्रकारांबाबत अतिशय परखड शब्दांमध्ये टिप्पणी केली आहे. ‘लिव्ह इन’च्या मुद्यावर बोलताना न्यायालय म्हणाले की, भारतातील विवाह संस्था नष्ट करण्यासाठीचे हे नियोजित पाऊल आहे. ही टिप्पणी बलात्काराच्या आरोपीला जामीन मंजूर करताना केली आहे. विशेष म्हणजे हा आरोपी लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहात होता. विवाहसंस्थेत असणारे स्थैर्य लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये अपेक्षित करता येत नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे. नव्या युगात लिव्ह इन राहील, लग्न संपेल, असे बोलले जात आहे. पण लग्नाची जागा कुठलीही व्यवस्था घेऊ शकते का? लिव्ह इन म्हणजे लग्नाच्या बंधनाशिवाय एकत्र राहून शारीरिक संबंध ठेवण्याचे स्वातंत्र्य. थोडक्यात, सहमतीने विवाह न करता विवाहोत्तर आयुष्य जगणे होय. भारतामधे लिव्ह इनची कोणतीही कायदेशीर व्याख्या नाही, तरीही न्यायालयांनी त्यासाठी काही अटी निर्धारित केलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २०१० मध्ये दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयात लिव्ह इन रिलेशनला मान्यता दिली होती. सहजीवनाविषयी (लिव्ह इन रिलेशन) २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वेही जारी केली होती. त्यानुसार संबंध स्वीकारार्ह ठरण्यासाठी ते एवढ्या काळापर्यंत कायम असायला हवेत की, ते टिकाऊ मानले जाऊ शकतील. लिव्ह इनमध्ये राहणारे दोघेही विवाहित नसणे आणि दोघांचीही संमती असणे आवश्यक असते. अशी काही मार्गदर्शक तत्त्वे न्यायालयाने यासंदर्भात घालून दिली आहेत. आता अलाहाबाद उच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या महिलांना नंतरच्या काळात पती शोधणे कठीण होत आहे. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार ब्रेकअपनंतर पुरुष जोडीदाराला दुसरा जोडीदार किंबा पत्नी मिळण्यात फारशा अडचणी येत नसल्या तरी मुलींबाबत असे होत नाही. याचे कारण आपल्याकडील समाजव्यवस्था त्याला सामान्य मानत नाही. अशा नात्यांतून मूल जन्माला आलं तर या समस्येचे इतर पैलू समोर येतात. या पद्धतीच्या केसेस न्यायालय रोजच हाताळत असते, असेही न्यायालयाने म्हटले आहे. सहारनपूर जिल्ह्यातील अशाच एका आरोपीच्या प्रकरणात न्यायालयाने ही निरीक्षणे नोंदवली आहेत. या प्रकरणामध्ये आरोपी असणारा पुरुष १८ एप्रिलपासून तुरुंगात होता. त्याला आयपीसी कलम ३७६ (बलात्कार), ३१६ आणि ५०६ आणि पॉस्को कायद्यानुसार अटक करण्यात आली. आता त्याला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. हे जोडपे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहात होते. लिव्ह इन प्रणाली ही भारतीय विवाह व्यवस्था नष्ट करण्यासाठी एक सुनियोजित रचना आहे, असा शेरा मारताना न्यायालयाने विवाह पद्धतीचे महत्त्व सांगून लिव्ह इनमधील उणिवा निदर्शनास आणून दिल्या आहेत. लिव्ह इनच्या बाजूने असलेल्या जोडप्यांचे म्हणणे आहे की, यात कोणत्याही अपेक्षांचा बोजा नसतो आणि जबाबदारीचे ओझेही नसते. आपल्याला पाहिजे तोपर्यंत हे नाते सांभाळायचे आणि नंतर रिलेशनशिपमधून बाहेर पडता येते. त्यामुळेच अलीकडील काळात लिव्ह इन रिलेशनशिपकडे लग्नाला पर्याय म्हणूनही पाहणारा वर्ग निर्माण झाला आहे. परंतु या संबंधांची व्याप्तीच मुळात एवढी अस्पष्ट आहे, की आपल्या अधिकारांची आणि कर्तव्यांची लक्ष्मणरेषा कोणती आहे, हे खुद्द असे संबंध प्रस्थापित करणाऱ्या उभयतांना अखेरपर्यंत समजत नाही. परिणामी अशा संबंधांमध्ये कालांतराने कटुता निर्माण होते. असे संबंध सामान्यतः अशा कराराच्या स्वरूपात प्रस्थापित केले जातात, ज्यात संबंधांच्या व्यतिरिक्त प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले जात आहे, हे गृहित धरले जाते. परंतु असे होऊ शकत नाही. कारण जिथे संबंध आहेत, तिथे अपेक्षा मूळ धरू लागतात आणि ते स्वाभाविकच असते.

## संपादकीय »

# नवी रणनीती!

***काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ‘भारत जोडो यात्रा’ आरंभली तेव्हापासून त्यांचा राजकीय प्रवास वेगळ्या पद्धतीने सुरू असल्याचे दिसत आहे.***

राहुल गांधी यांनी ‘भारत जोडो यात्रा’ आरंभली तेव्हापासून त्यांचा राजकीय प्रवास वेगळ्या पद्धतीने सुरू असल्याचे दिसत आहे. अलीकडेच राहुल अचानक दिल्लीतील आनंद विहार रेल्वे स्थानकावर पोहोचले. तेथे त्यांनी हमालांची (कुली) भेट घेतली आणि पाहता पाहता हमालांचे लाल कपडे घालत सामान डोक्यावर घेतले. गेल्या काही महिन्यांत शेतकरी बनलेले राहुल, ट्रकचालकांसोबत झालेल्या बैठकीत चालकाची भूमिका बजावणारे राहुल आणि वाहनदुरुस्ती करणाऱ्या मेकॅनिकसोबतचे राहुल, अशी त्यांची विविध रूपे अलीकडील काळात समोर येत आहेत. ही शैली, हे राजकारण बरेच काही सांगून जाते. यामागचा हेतू स्पष्टपणे सामान्यांच्या लक्षात येतो. 2014 आणि त्यानंतर 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने राहुल यांच्या विरुद्ध प्रतिमाहननाची जोरदार मोहीम उघडली होती.

**आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाने लाखोंचे मोर्चे काढले. पण त्यात शांततेला कुठं धक्का लावला नाही. पण तोच मराठा बांधव आरक्षणसाठी रस्त्यावर उतरला असता, जबर मारहाण करून आंदोलन दडपण्याचा तिरेकी प्रयत्न केला गेला. या हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात समाजमन संतप्त झाले. मारा झोडा फोडा आणि राज्य करा ही ब्रिटिशकालीन मानसिकता राज्यकर्त्यांनी सोडायला हवी.**

# मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटवू नये !

भारतीय लोकशाहीमधे सुसंवादाने प्रश्न सोडविण्याची शक्ती आहे. मग लहान थोर न बघता शांततेने न्याय हक्काची मागणी करणाऱ्यांशी जनरल डायर सारखे का वागावे? गेल्या काही दशकांमधे ग्रामीण-शहरी समाजरचनेमधे आमुलाग्र बदल झालेत. त्या सगळ्या पार्श्वभूमीवर मराठा आणि ओबीसी या दोन्ही बाजूंचा साकल्यानं विचार व्हायला हवा. मराठा, कुणबी आणि ओबीसी समूहातील अनेक जाती यांचे मुख्यत्वे शेती हे एकमेव उपजीविकेचे साधन आहे. शेती हा तुकड्यात विभाजित होणारा तोट्याचा व्यवसाय आहे. निसर्गावर आधारित शेती व्यवसाय असल्याने कधी अल्पवृष्टीमुळे तर कधी अतिवृष्टीमुळे पीक हातचे जाते. निसर्गाच्या तडाख्यातून शेतकरी वाचलाच तर सरकार कमी भावाचा तडाखा देतात. यामुळे हलाखीचे जीवन शेतकऱ्यांच्या वाट्याला आले आहे. हळूहळू कुटुंबे विभक्त होत गेली. असलेल्या शेतीची भाऊबंदकीत वाटणी




होत होत बहुतेक कुटुंबे अल्प, अत्यल्प भूधारक झालीत. अनेकजण शेतमजूर झालीत. सध्यस्थितीत शारीरिक कष्ट हे त्यांचे जगण्याचे साधन झाले. नव्याने शेती विकत घेणे तर त्यांच्या आवाक्याबाहेर झाले. आता भांडवलदार, व्यापारी, अधिकारी व नोकरदार हे स्वतः शेती न कसणारे नवे शेतकरी झाले. खरा शेतकरी मात्र कंगाल होत चालला. कसेल त्याची जमीन हे सूत्र कालबाह्य झाले. भविष्यात उद्भवणाऱ्या अशा भयाण संकटाची चाहूल ओळखून, शेती मातीशी ईमान राखून देशाचे पोट भरण्यासाठी राबणाऱ्यांना (इतर मागासवर्गियांना) भविष्यात आरक्षणाचे फायदे मिळावे यासाठी पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यावेळी सर्व मराठा समाजबांधवांना आपल्या शासकीय दस्तऐवजात कुणबी म्हणून नोंद करण्याचे आवाहन कळकळीने केले होते. काहींनी तो बदल केला. काहींनी प्रतिष्ठेपोटी केला नाही. आरक्षणाच्या फायदया संदर्भात तितकीशी जागृती नसल्यानेही असे घडले असावे.

आजच्या परिस्थितीत आर्थिकदृष्या दारिद्र्याच्या खाईत लोटल्या गेलेल्या गरीब मराठा शेतकरी बांधवांची आर्थिक घडी दिवसागणिक विस्कटली गेली. आता बहुतेक मराठा कुटूंबे सामाजिकदृष्ट्या मागास दिसतात. त्यांचेकडे दुय्यम व्यवसाय नाही. महागडे झालेल्या शिक्षणासाठी सोय नाही. मुलांना नोकरी नाही. स्त्रियांनाही घरातील कामे आवरून मजुरीला जावे लागते. त्यामुळे गरीब मराठा समाजही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतीक दृष्या उन्नत व्हावा यासाठी त्यांना आरक्षण मिळावे ही जनभावना महाराष्ट्रात प्रकर्षाने दिसून येते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# शरद पवार काय मेणाचा पुतळा आहे ?

## शिंदेंची शिवसेना म्हटले की लोक हसतात : संजय राऊत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे. शरद पवार हे हयात आहेत. निवडणूक आयोगाच्या सुनावणीवेळी शरद पवार समोर बसलेले होते. असे असताना त्यांच्यासमोर अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल दावा करतात की, राष्ट्रवादी पक्ष आमचा आहे.**

असे असले तर समोर बसलेले शरद पवार काय मेणाचा पुतळा म्हणून बसले होते का? असा संतप्त सवाल खासदार संजय राऊत यांनी केला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगासमोर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादीचे संस्थापक, अध्यक्ष शरद पवार हे निवडणूक आयोगासमोर बसलेले असतानाच अजित पवार यांच्या गटाच्या वतीने हा दावा करण्यात आला आहे. अजित पवार गटाच्या या कृतीवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. शरद पवार निवडणूक आयोगासमोर बसलेले असतानाच तुम्ही पक्षावर दावा कसे सांगता? असा प्रश्न संजय राऊत यांनी विचारला आहे.



जर असे असेल तर समोर बसलेले शरद पवार काय मेणाचा पुतळा आहे काय? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. खासदार संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. पक्षाचा अध्यक्ष समोर बसलेला असताना, त्याच्या पक्षावर दुसरा दावा करतो. हे सर्व प्रकार भाजपने सुरू केले असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या देशाची लोकशाही घटना खड्डयात घालणारा हा पक्ष असल्याची टीका देखील उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. बाळासाहेब ठाकरे आमचे विठ्ठल आहेत, असे तुम्ही म्हणत होता. मात्र, तरी देखील भाजपने पक्ष फोडला. फोडा, झोडा आणि राज्य करा, अशी नवी नीती भाजपने देशाच्या राजकारणात आणली असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. शिवसेना फोडली. काँग्रेस फोडला, समाजवादी पार्टी फोडण्याचा प्रयत्न झाला. तुम्ही किती पक्ष फोडले तरी मूळ विचार मूळ पक्षाकडे राहत असतो, असा दावाही संजय राऊत यांनी केला आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना असे म्हटले की लोक हसत असल्याचा आरोपही संजय राऊत यांनी केला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपला पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांबरोबर मुंबईसह राज्यातील 14 महानगरपालिकांच्या निवडणुका घेण्याचे आवाहन केले. राजस्थान, मध्यप्रदेशमध्ये आम्ही जिंकलो होतो. तेलंगनाही आम्ही शंभर टक्के जिंकू. पाचही राज्यात वेळेत निवडणुका व्हाव्यात, अशी अपेक्षा संजय राऊत यांनी व्यक्त केली.

### हे प्रकार भाजपने सुरू केले

» खासदार संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. पक्षाचा अध्यक्ष समोर बसलेला असताना, त्याच्या पक्षावर दुसरा दावा करतो. हे सर्व प्रकार भाजपने सुरू केले असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या देशाची लोकशाही घटना खड्डयात घालणारा हा पक्ष असल्याची टीका देखील उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.

# मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला?

## भाजपला 8 तर मित्रपक्षांना 6 खाती

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारचा रखडलेला मंत्रिमंडळ विस्तार घटस्थापनेच्या मुहूर्तावर मार्गी लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसे संकेत आधीच दिले होते. त्यामुळे तिन्ही पक्षातील इच्छुक आमदारांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत. या विस्तारात भारतीय जनता पक्षाला 8 तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी 6 मंत्रिपदे मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होताना केंद्र सरकारमध्ये 1 कॅबिनेट मंत्रिपद तर 2 राज्यमंत्रिपदांचे आश्वासन घेतले होते. या बाबतही अजित पवार आग्रही आहे. त्यामुळे केंद्राचा मंत्रिमंडळ विस्तार देखील लवकरच होण्याची शक्यता आहे. त्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही सत्तेत जास्तीचा वाटा आहे.



### शिंदे यांच्या शिवसेनेलाही जास्तीचा वाटा

» राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होताना केंद्र सरकारमध्ये 1 कॅबिनेट मंत्रिपद तर 2 राज्यमंत्रिपदांचे आश्वासन घेतले होते. या बाबतही अजित पवार आग्रही आहे. त्यामुळे केंद्राचा मंत्रिमंडळ विस्तार देखील लवकरच होण्याची शक्यता आहे. त्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही सत्तेत जास्तीचा वाटा आहे. त्या संबंधी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याचीही माहिती आहे. इतकेच नाही तर एकनाथ शिंदे यांच्याही गटाला केंद्रात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

त्या संबंधी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याचीही माहिती आहे. इतकेच नाही तर एकनाथ शिंदे यांच्याही गटाला केंद्रात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या पितृपंधरवडा सुरू आहे. त्यामुळे या बाबतची घोषणा होणार नाही. पितृपंधरवडा संपताच 15 किंवा 16 ऑक्टोबरला मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो. सध्या भाजप, शिवसेना यांचे प्रत्येकी 10 मंत्री आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे 9 मंत्री आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने एका मोठ्या नेत्यासाठी एक खाते रीक्त ठेवले आहे.

यात जयंत पाटील यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. त्यांचा सत्तेत प्रवेश शपथविधीसह होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मंत्रिमंडळ विस्तारात आपल्याला संधी मिळेल, या आशेमुळे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्ताराकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. विस्तारात कोणाला संधी मिळेल, हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे शिंदे गटातील अस्वस्थता गेले काही दिवस वाढत चालली आहे.

# आरोग्य यंत्रणेचा कायापालट!

## सर्व जिल्ह्यांत अद्ययावत रुग्णालये, मुख्यमंत्र्यांची घोषणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



ठाणे, नांदेड व छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णांचे मृत्यू झाल्याने शासनावर टीका होऊ लागताच आरोग्य यंत्रणेचा संपूर्ण कायापालट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३४ जिल्ह्यांमध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालये उभारणे तसेच ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी युद्धपातळीवर पावले टाकण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी दिले.

राज्यातील आरोग्य व्यवस्थेबाबत शिंदे यांनी मंत्रालयात आढावा बैठक घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनीही आरोग्यावरील गुंतवणूक, पदभरती याबाबत सूचना केल्या. बैठकीला आरोग्य मंत्री तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृतीदलाचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आदी उपस्थित होते. नवीन सुविधायुक्त जिल्हा रुग्णालये उभारण्याबाबतचा आराखडा पंधरा दिवसांत सचिवांच्या समितीने तयार करावा आणि २०३५ पर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाचा विचार करून राज्यासाठी आरोग्याचे एक सर्वंकष ' धोरण (व्हिजन) ' तयार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

### औषधांचा तुटवडा नको !

जिल्हा नियोजनमधून औषध खरेदीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्यांनी वेळ न गमवता आपापल्या ठिकाणी रुग्णालयांत लागणारी औषधे, वैद्यकीय उपकरणे दरपत्रकानुसार तत्काळ खरेदी करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

# काँग्रेशासित राज्यांत जात जनगणना!

## जिथे सरकार येईल, तिथे जात जनगणना करू: राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील काँग्रेस कार्यालयात कार्यकारिणीच्या बैठकीनंतर राहुल गांधी म्हणाले - ज्या राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार आहे तेथे जात जनगणना केली जाईल. छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणामध्ये आमचे सरकार येणार आहे. आमच्याकडे जात जनगणनेची आकडेवारी नाही, सरकारने ती आकडेवारी जाहीर केली नाही तर आमचे सरकार सत्तेवर आल्यावर आम्ही ती जाहीर करू.**



या देशात कोणाची लोकसंख्या किती आहे? देशाची संपत्ती या लोकांच्या हातात आहे की नाही हा प्रश्न आहे. देशातील संस्थांमध्ये किती आदिवासी, ओबीसी आणि दलित आहेत? हा प्रश्न आहे. भारतातील संस्था किती आहेत? हे आम्ही विचारत आहोत. तुम्हाला देश तोडायचा आहे, असे पंतप्रधान म्हणत आहेत, यावर तुम्ही काय बोलणार? तत्पूर्वी, सोनिया गांधी, अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह काँग्रेसचे नेते या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत खरगे म्हणाले- समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणकारी योजनांमध्ये योग्य सहभागासाठी सामाजिक-आर्थिक डेटा असणे आवश्यक आहे. देशव्यापी जात जनगणनेची मागणी काँग्रेस सातत्याने करत आहे, मात्र भाजप या मुद्द्यावर मौन बाळगून आहे. यापूर्वी, 16 सप्टेंबर रोजी हैदराबादमध्ये CWC बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला सोनिया गांधी आणि राहुल गांधीही उपस्थित होते. बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रस्तावात केंद्र सरकार राजकीय, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या आघाडीवर पूर्णपणे अपयशी ठरल्याचे म्हटले आहे. भाजप हे देशाच्या घटनात्मक आणि संघराज्य रचनेला आव्हान असल्याचा दावा करण्यात आला. या बैठकीपूर्वी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले होते की, मोदी सरकार महागाई, बेरोजगारी, मणिपूर हिंसाचार आणि असमानता रोखण्याच्या मुद्द्यांवर पूर्णपणे अपयशी ठरत आहे. भारतीय राष्ट्रीय सर्वसमावेशक आघाडीला (इंडिया) ज्याप्रमाणे यश मिळत आहे, त्याचप्रमाणे भाजप सरकार विरोधी पक्षांवर कारवाई करण्यात व्यस्त आहे, असेही खरगे म्हणाले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 20 ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) घोषणा केली होती. 39 सदस्यांच्या या समितीत सोनिया, राहुल, प्रियंका यांचा समावेश आहे. त्याचबरोबर माजी पंतप्रधान मनमोहन सिंग (90) यांनाही समितीत कायम ठेवण्यात आले आहे. या वर्षाच्या अखेरीस तिन्ही राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. खरगे यांनी त्यांच्या विरोधात निवडणूक लढवणारे शशी थरूर यांचाही कार्यकारिणीत समावेश केला आहे. CWC मध्ये एकूण 84 नावे आहेत. यामध्ये CWC सदस्य, स्थायी निमंत्रित, सरचिटणीस, विशेष निमंत्रित आणि प्रभारी यांच्या नावांचा समावेश आहे. भाजपने आपल्या सोशल मीडिया हँडलवर राहुल गांधींचे पोस्टर जारी केले आणि त्यांना नव्या युगाचा रावण म्हटले. पक्षाने लिहिले- नव्या युगाचा रावण आला आहे. तो दुष्ट आहे, धर्मविरुद्ध आहेत आणि रामाच्या विरोधात आहेत.

### 20 ऑगस्ट रोजी CWC ची घोषणा

» काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 20 ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) घोषणा केली होती. 39 सदस्यांच्या या समितीत सोनिया, राहुल, प्रियंका यांचा समावेश आहे. त्याचबरोबर माजी पंतप्रधान मनमोहन सिंग (90) यांनाही समितीत कायम ठेवण्यात आले आहे. मध्य प्रदेशातील दिग्विजय सिंग आणि कमलेश्वर पटेल, छत्तीसगडचे ताम्रध्वज साहू आणि राजस्थानचे सचिन पायलट यांना CWC मध्ये स्थान मिळाले आहे. या वर्षाच्या अखेरीस तिन्ही राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. खरगे यांनी त्यांच्या विरोधात निवडणूक लढवणारे शशी थरूर यांचाही कार्यकारिणीत समावेश केला आहे. CWC मध्ये एकूण 84 नावे आहेत. यामध्ये CWC सदस्य, स्थायी निमंत्रित, सरचिटणीस, विशेष निमंत्रित आणि प्रभारी यांच्या नावांचा समावेश आहे.

# 5 राज्यांतील निवडणुका जाहीर!

## 8192 मतदान केंद्रांवर महिलांची कमान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोरम या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) राजीव कुमार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, छत्तीसगडमध्ये 7 आणि 17 नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान होणार आहे. याशिवाय मध्य प्रदेशात 17 नोव्हेंबर आणि राजस्थानमध्ये 23 नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.**




### भाजपला तेलंगणात फक्त एक जागा

» तेलंगणात 2018 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला केवळ एक जागा मिळाली होती. सध्याचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या पक्ष TRS (पक्षाचे नाव तेलंगणा राष्ट्र समिती वरून बदलून 2022 मध्ये भारत राष्ट्र समिती असे करण्यात आले) यांना सर्वाधिक 88 जागा मिळाल्या होत्या. तर काँग्रेसला १९ जागा मिळाल्या. सध्याच्या परिस्थितीबद्दल बोलायचे झाले तर सत्ताधारी पक्षाकडे सध्या विधानसभेच्या 119 जागांपैकी 101 आमदार आहेत.

निवडणूक आयोगानुसार, एकाच टप्प्यात मिझोरममध्ये ७ नोव्हेंबरला आणि तेलंगणात ३० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. पाचही राज्यांचे निकाल ३ डिसेंबरला लागणार आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले की, या राज्यांमध्ये एकूण 16.14 कोटी मतदार आहेत. यामध्ये ८.२ कोटी पुरुष आणि ७.८ कोटी महिला मतदार असतील. यावेळी 60.2 लाख नवीन मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. मध्य प्रदेशात गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर बरेच राजकीय नाट्य रंगले होते. निवडणूक निकालात काँग्रेसला भाजपपेक्षा पाच जागा जास्त मिळाल्या होत्या. काँग्रेसला 114 तर भाजपला 109 जागा मिळाल्या होत्या. बसपाने दोन तर सपाने एक जागा जिंकली. युती करून काँग्रेसने बहुमताचा 116 आकडा गाठला आणि कमलनाथ राज्याचे मुख्यमंत्री झाले. काँग्रेसचे सरकार केवळ 15 महिने टिकू शकले. प्रत्यक्षात काँग्रेसच्या २२ आमदारांनी राजीनामा दिला. यात सहा मंत्र्यांचा सहभाग होता. सभापतींनी मंत्र्यांचे राजीनामे स्वीकारले. राजीनाम्यामुळे कमलनाथ सरकार अल्पमतात आले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, न्यायालयाने कमलनाथ सरकारला फ्लोअर टेस्ट करण्याचे आदेश दिले. पण फ्लोर टेस्टपूर्वी कमलनाथ यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. नंतर भाजपने बंडखोर आमदारांचा समावेश करून 127 आमदारांची संख्या वाढवली आणि सरकार स्थापन केले.

# इस्रायल सैन्याला गाझा पट्टी ताब्यात घेण्याचे आदेश!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इस्रायलने आपल्या सैन्याला संपूर्ण गाझा पट्टी ताब्यात घेण्याचे आदेश दिले आहेत. 48 तासांत इस्रायलने गाझा सीमेवर 3 लाख सैनिक तैनात केले आहेत. इस्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलंट यांनी अधिकाऱ्यांना गाझा पट्टीला अन्न, पाणी, वीज आणि इंधनाचा पुरवठा थांबवण्यास सांगितले आहे. मात्र, लष्कराने सीमेवरील इस्रायलचे भाग हमासच्या लढवय्यांपासून मुक्त केले आहेत.

मात्र, तरीही पॅलेस्टाईनमधून लढवय्ये इस्रायलमध्ये प्रवेश करत आहेत. त्याचवेळी इस्रायलच्या हवाई दलाने हमास आणि पॅलेस्टिनी इस्लामिक जिहादच्या 500 वॉर रूम्स एका रात्रीत नष्ट केल्या. युद्धाच्या तिसऱ्या दिवशी आतापर्यंत 800 इस्रायलींचा मृत्यू झाला आहे. इस्रायलच्या प्रत्युत्तरात 500 पॅलेस्टिनी ठार झाले असून 2000 हून अधिक जखमी झाले आहेत.दुसरीकडे इस्रायलने केलेल्या हल्ल्यात 4 इस्रायलींचाही मृत्यू झाल्याचा दावा हमासने केला आहे. ते हमासच्या कैदेत होते. 130 लोकांचे अपहरण केल्याचा दावा हमासने केला आहे. त्यांना वाचवण्यासाठी त्यांना गाझा पट्टीतील बोगद्यांमध्ये ठेवण्यात आले आहे. ते या ओलिसांचा मानवी ढाल म्हणून वापर करणार आहेत, जेणेकरून इस्रायलने हल्ला केला तर त्यांचेच लोक मारले जातील. इस्रायलच्या संरक्षण दलाने सांगितले की, ओलीस ठेवलेल्यांमध्ये महिला, मुले आणि कुटुंबांचा समावेश आहे. हमासच्या हल्ल्यात आतापर्यंत 28 परदेशी नागरिकांचा जीव गेल्याचेही वृत्त आहे. यामध्ये नेपाळचे 10, अमेरिकेचे 4, थायलंडचे 12 आणि युक्रेनचे 2 नागरिक आहेत. अनेक देशांनी आपल्या नागरिकांना इस्रायलमधून बाहेर काढण्याचे कामही सुरू केले आहे.

# तारक मेहता फेम बबीता थोडक्यात वाचली!

सध्या साऱ्या जगाचं लक्ष लागलं आहे ते इस्राइल आणि पॅलेस्टाईनमधील युद्धाकडे. शनिवारी सुरू झालेले दोन्ही देशांमधील युद्ध अजूनही सुरू असून तीव्र होत आहे. त्यातच आता या युद्धाबाबत नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. तर भारताने इस्राइलला पाठिंबा दिला आहे. मात्र या सर्वांत अभिनेत्री नुरसत भरुचाची जास्त चर्चा रंगली. दोन्ही देशांच्या या युद्धात नुसरत वाईटरित्या अडकली होती. अखेर भारतीय दुतावासाच्या मदतीने तिला भारतात सुखरूप आणण्यात आले आहे. मात्र नुसरतच नाही तर आणखी एक अभिनेत्री इस्राइलला अडकली असती. पण तिचं दैव्य बलवत्तर म्हणुन ती थोडक्यात बचावली आहे. ती अभिनेत्री आहे 'तारक मेहता का उल्टा चष्मा' फेम बबिता म्हणजेच मुनमुन दत्ता. आता मुनमुनने स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून एक पोस्ट करत ती या युद्धात अडकण्यापासून कशी थोडक्यात बचावली या बाबात तिच्या चाहत्यांना सांगितले आहे. मुनमुन तिच्या इंस्टाग्राम स्टोरीत लिहिते, "मी तुम्हाला खरं सांगत आहे, सध्या मी इस्रायलमध्ये अडकली असती. माझी तिकिटेही बुक झाली होती, पण मला ती तिकीट तारीख पुढच्या आठवड्यात करावी लागली. 'तारक मेहता'मुळे अचानक माझी नाईट शिफ्ट वाढवण्यात आली. सुरुवातीला मला खूप वाईट वाटले पण आता मला समजले की जे काही होते ते चांगल्यासाठीच होते. मी आज माझा जीव गमावू शकले असते.



# दीपिकानंतर आता निक्कीचा नंबर!



टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री निक्की तांबोळी ही नेहमीच तिच्या बोल्डनेसमुळे चर्चेत आली आहे. तिचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. आता निक्की एका वेगळ्याच कारणामुळे वादाचे कारण ठरताना दिसत आहे. यंदाच्या वर्षी जानेवारीमध्ये किंग खानचा पठाण नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. तो एका कारणामुळे खूपच चर्चेत आला होता. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे दीपिकाच्या भगव्या रंगाच्या बिकीनीवरुन खूपच मोठा वाद झाला होता. काही धार्मिक संघटनांनी त्यावरुन आक्रमक पवित्राही घेतल्याचे दिसून आले होते. यासगळ्यात वेगवेगळ्या थिएटर्समध्ये पठाणचे शो बंद पाडण्याचा प्रकार दिसून आला होता. आता टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील निक्की ही देखील वादाचे कारण ठरत आहे. तिचा भगवा रंगाची बिकीनी परिधान केलेला व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यावर तिला मिळालेल्या प्रतिक्रियाही भलत्याच तिखट आहे. यावरुन काही नेटकऱ्यांनी या व्हिडिओवरुन काही धार्मिक प्रश्न देखील उपस्थित केल्याचे दिसून आले आहे. विरल भयानीनं तो व्हिडिओ व्हायरल केला आहे. यापूर्वी देखील निक्की तिच्या वेगवेगळ्या कारणांमुळे नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा विषय झाल्याचे दिसून आले आहे. भगवा रंग हा आता वादाचे कारण ठरतो आहे.त्यामुळेच की काय त्यावरुन कित्येक बॉलीवूडच्या सेलिब्रेटींनी विविध प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली होती. आपण कशालाही भावनिक स्वरुप देत त्यावरुन वाद तयार करतो असा सूर सेलिब्रेटींनी आळवला होता. निक्कीला नेटकऱ्यांनी ज्या प्रतिक्रिया दिल्या आहेत त्यातून तिच्यावर परखड शब्दांत निशाणा साधण्यात आला आहे. अशा रंगाची बिकीनी परिधान करुन तुला काय सांगायचे आहे हे जरा कळू शकेल का असा प्रश्न नेटकऱ्यांनी तिला केला आहे. काहींनी तिच्या सौंदर्याचे कौतुकही केले आहे.

# लग्न नको रे बाबा

बॉलीवूडमधील निवडक काही चित्रपटांमध्ये तसेच वेब सीरिजमध्ये प्रभावी अभिनय करणाऱ्या सयानीचा चाहतावर्ग मोठा आहे. तिच्या अभिनयाचे चाहते प्रचंड आहेत. सोशल मिडियावर नेहमीच वेगवेगळ्या कारणासाठी ॲक्टिव्ह असणाऱ्या सयानीनं वयाची ३८ वर्षे पूर्ण केल्यानंतर देखील तिनं लग्न केलेलं नाही. सयानीच्या जन्मदिनानिमित्तानं तिला चाहत्यांनी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिचं कौतुकही केलं आहे. काही झालं तरी तिचे चाहते आणि नेटकरी तिला हमखास तिच्या लग्नावरुन प्रश्न विचारतातच. अशात सयानी देखील सगळ्यांना उत्तरं देत बसत नाही. सयानीच्या चित्रपटांविषयी सांगायचे झाल्यास तिनं आतापर्यंत पोशम पा, आर्टिकल १५, मार्गारिटा विद द स्ट्रॉ, सारख्या चित्रपटांनी प्रेक्षकांच्या मनावर गारुड केले आहे. बॉलीवूडमध्ये एका वेगळ्या शैलीच्या अभिनयासाठी सयानीकडे पाहिले जाते. सयानी ही केवळ अभिनेत्रीच नाहीतर की चांगली व्हाईस ओव्हर आर्टिस्ट आणि गायिका म्हणूनही लोकप्रिय आहे. सयानी तिच्या प्रोफेशनल लाईफमध्ये यशस्वी झाली आहे. मात्र तिला तिच्या वैयक्तिक आयुष्यावरुन नेहमीच ट्रोल केले गेले आहे.




# गौतमीच्या डान्सची सापालाही पडली भुरळ!

सध्या महाराष्ट्रातील एकही जिल्हा असा नाही की ज्याठिकाणी गौतमीचा कार्यक्रम पार पडला नाही. वेगवेगळ्या शहरांमध्ये गौतमीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याला प्रेक्षकांचा, चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. शहरात गौतमीच्या नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत तिथे नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे गोंधळ झाला आहे. अशातच पुन्हा एका नव्या घटनेनं चर्चेला उधाण आले आहे. त्याचे झाले असे की, मुंबईतील मानसरोवर रेल्वे स्थानकाजवळ गौतमीच्या नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्या कार्यक्रमात साप शिरल्यानं काही प्रमाणात गोंधळ झाल्याचे दिसून आले आहे.

# साऊथच्या चित्रपटांना 'गणपथ'चं ओपन चॅलेंज!

बॉलीवूडचा प्रसिद्ध ॲक्शनहिरो टायगर श्रॉफच्या गणपथचा ट्रेलर आता प्रेक्षकांसमोर आला असून त्यानं लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रेक्षकांना आणि टायगरच्या चाहत्यांना गणपथच्या ट्रेलरची उत्सुकता होती. त्यावर नेटकऱ्यांच्या आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहेत. बॉलीवूडमध्ये आपल्या ॲक्शननं प्रेक्षकांना नेहमीच खुश करणाऱ्या टायगरचा या चित्रपटातील अंदाज हा भलताच तिखट आहे. त्यानं यापूर्वी वेगवेगळ्या ॲक्शनपटांमध्ये काम केले आहे.आज हॉलीवूडच्या धर्तीवर बॉलीवूडमध्ये दोनच अभिनेत्यांचे नाव अग्रक्रमानं घेतले जाते. त्यात पहिल्या क्रमांकावर विद्युत जामवाल आणि दुसऱ्या स्थानी टायगर श्रॉफचे नाव घ्यावे लागेल. टायगरसोबत प्रमुख अभिनेत्री म्हणून क्रिती सेनन दिसणार आहे. यापूर्वीच्या त्याच्या ॲक्शन चित्रपटांमध्ये दिशा पटानीनं काम केलं होतं. मात्र या दोन्ही सेलिब्रेटींमध्ये ब्रेक अप झाल्याच्या बातम्यांना उधाण आल्यानं टायगर आणि क्रिती सेनॅन यांच्या जोडीनं प्रेक्षकांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे.



# विश्वचषकात न्यूझीलंडचा दुसरा विजय!

## » स्पर्धेत 5 बळी घेणारा सॅन्टनर पहिला किवी फिरकीपटू

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**न्यूझीलंडने वर्ल्ड कपमध्ये सलग दुसरा विजय मिळवला आहे. किवी संघाने नेदरलँड्सचा 99 धावांनी पराभव केला. या विजयानंतर संघ 4 गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर कायम आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर न्यूझीलंड संघाने प्रथम फलंदाजी करताना 50 षटकांत 7 गडी गमावून 322 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना नेदरलँडचा संघ 46.3 षटकात 223 धावांवर सर्वबाद झाला.**




किवी संघाकडून मिचेल सँटनरने शानदार गोलंदाजी केली. त्याने 5 विकेट घेतल्या. सँटनरने रायन क्लाइन (8 धावा), रोएलॉफ व्हॅन डर मर्वे (एक धाव), कर्णधार स्कॉट एडवर्ड्स (30 धावा), कॉलिन अकरमन (69 धावा), मॅक्स ओ'डॉड (16 धावा) यांचे बळी घेतले. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या नेदरलँड संघाला पहिल्या 10 षटकांत केवळ 35 धावा करता आल्या. पॉवरप्लेमध्ये नेदरलँडने सलामीवीर विक्रमजीत सिंगची विकेटही गमावली. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंड संघाने 50 षटकात 7 विकेट गमावत 322 धावा केल्या.

सलामीवीर विल यंगने 70 धावा, रचिन रवींद्रने 51 धावा आणि टॉम लॅथमने 53 धावांचे अर्धशतक झळकावले, तर डॅरिल मिशेलने 48 धावा केल्या. आर्यन दत्त, पॉल व्हॅन मीकरेन आणि रोएलॉफ व्हॅन डर मर्वे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. बास डी लीडेला एक विकेट मिळाली. क्रमांक-3 वर फलंदाजीला आलेल्या रचिन रवींद्रने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील आणि विश्वचषकातील सलग दुसरे अर्धशतक झळकावले. रवींद्रने 51 चेंडूत 3 चौकार आणि 1 षटकारासह 51 धावांची खेळी खेळली. त्याला व्हॅन डर मर्वेने बाद केले. किवी सलामीवीर विल यंगने आपल्या वनडे कारकिर्दीतील सहावे अर्धशतक झळकावले. यंग 80 चेंडूत 70 धावा करून बाद झाला. त्याने 87.50 च्या स्ट्राईक रेटने 7 चौकार आणि 2 षटकारांच्या मदतीने धावा केल्या. नाणेफेक हरल्यानंतर फलंदाजीला आलेल्या न्यूझीलंडने चांगली सुरुवात केली. संघाने 10 षटकात बिनबाद 63 धावा केल्या. कॉनवे आणि यंग यांनी पन्नासची भागीदारी केली. या विश्वचषकात दोन्ही संघांचा हा दुसरा सामना आहे. न्यूझीलंडने पहिला सामना गतविजेत्या इंग्लंडविरुद्ध खेळला. यामध्ये त्याने 9 विकेट्स राखून विजय मिळवला. दुसरीकडे, नेदरलँडला पहिल्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध 81 धावांनी पराभव पत्करावा लागला. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत 4 वनडे सामने खेळले गेले आहेत. न्यूझीलंडने सर्व जिंकले. शेवटचा सामना एप्रिल 2022 मध्ये झाला होता. यामध्ये न्यूझीलंडने 115 धावांनी विजय मिळवला. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दोघांमध्ये सामना झाला होता, जो न्यूझीलंडने जिंकला होता. नेदरलँडने गेल्या पाचपैकी दोन सामने जिंकले आहेत. तीन सामन्यांत संघाचा पराभव झाला आहे.

### नेदरलँड्सचा 99 धावांनी पराभव

» शेवटच्या 5 एकदिवसीय सामन्यांपैकी न्यूझीलंडने तीन जिंकले, एक गमावला आणि एकाचा निकाल लागला नाही. मात्र, यंदाचा एकूण विक्रम न्यूझीलंडसाठी फारसा चांगला राहिला नाही. या संघाने 2023 मध्ये आतापर्यंत 21 एकदिवसीय सामने खेळले आहेत. 9 जिंकले आणि 11 हरले. एका सामन्याचा निकाल लागला नाही. डॅरिल मिशेल 2023 मध्ये न्यूझीलंडसाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आहे. गोलंदाजीत मॅट हेन्रीने सर्वाधिक बळी घेतले.

# राशिद खानने दाखवले मोठे मन!

## » भूकंपग्रतांना विश्वचषकाची फी केली दान

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज राशिद खान हा जगातील लोकप्रिय आणि महान गोलंदाज आहे. तो जितका चांगला गोलंदाज आहे तितकाच तो एक चांगला माणूसही आहे. याचा पुरावा त्याने अनेकदा त्याच्या चांगल्या स्वभावाने दिला आहे, पण आज त्यांनी याचा आणखी एक पुरावा दिला आहे. वास्तविक राशिद खानने वर्ल्ड कपमध्ये मिळालेली संपूर्ण मॅच फी दान करण्याची घोषणा केली आहे. अफगाणिस्तानमधील भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांनी आपली रक्कम दान केली आहे.**

राशिद खानने त्याच्या अधिकृत ट्वीटर अकाऊंटवरून याची घोषणा केली आहे. त्यांनी एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, “अफगाणिस्तानच्या पश्चिमेकडील प्रांतांमध्ये (हेरत, फराह आणि बादघिस) झालेल्या भूकंपाच्या वाईट परिणामांबद्दल ऐकून मला खूप दुख झाले आहे. भूकंपामुळे प्रभावित झालेल्यांना मदत करण्यासाठी मी माझे सर्व प्रयत्न समर्पित करत आहे. क्रिकेट विश्वचषक २०२३मध्ये मिळणारी मॅच फी दान करत आहे. आम्ही लवकरच एक फंड रेसिंग मोहीम सुरू करणार आहोत, ज्याद्वारे आम्ही पीडितांना मदत करू शकणाऱ्यांकडून मदत घेऊ. खरं तर, शनिवारी अफगाणिस्तानमध्ये एक जगाला हादरवणारा भूकंप झाला, ज्यामुळे सर्वत्र विध्वंसाचे दृश्य पसरले. अफगाणिस्तानमध्ये उपस्थित असलेल्या तालिबान सरकारच्या म्हणण्यानुसार, या भूकंपामुळे आतापर्यंत २००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, ९००० हून अधिक लोक जखमी झाले आहेत आणि १३०० हून अधिक घरे उद्ध्वस्त झाली आहेत. अफगाणिस्तानातील या भूकंपामुळे मृत आणि जखमी झालेल्यांची संख्या सातत्याने वाढत आहे.



### भारताचा पुढील सामना अफगाणिस्तानशी

» अफगाणिस्तानचा सुपरस्टार राशिद खान सध्या भारतात आयसीसी एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक खेळत आहे, परंतु त्याला आपल्या देशवासियांची खूप काळजी आहे, आणि म्हणूनच त्याने विश्वचषकाची संपूर्ण मॅच फी दान करण्याचा निर्णय घेतला आहे. आयसीसी विश्वचषक २०२३ मध्ये भारताचा पुढील सामना अफगाणिस्तानशी होणार आहे. हा सामना अरुण जेटली स्टेडियमवर होणार आहे.

# कोहलीच्या नावावर विराट विक्रमांची रांग!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

कोहलीने विश्वचषक-2023 च्या पहिल्याच सामन्यात अनेक विक्रम केले आहे. दोन धावांत 3 बाद... अशा कठीण परिस्थितीत विराट कोहलीने केएल राहुलच्या साथीने भारताचा डाव सावरला. विराट कोहलीने 85 धावांची झुंजार खेळी केली. विराट कोहलीने 116 चेंडूत 6 चौकारांच्या मदतीने 85 धावांची खेळी केली. विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा संयमी सामना केला. त्याने राहुलच्या साथीने भारताच्या डावाला आकार दिला.

दोघांनीही एकेरी दुहेरी धावसंख्यावर भर देत धावसंख्या सातत्याने हालती ठेवली. विराट कोहली आणि केएल राहुल यांनी चौथ्या विकेटसाठी 215 चेंडूत 165 धावांची भागिदारी केली. कोहलीने 85 धावांच्या खेळीसह विक्रमांची रांग लावली. वन-डे वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक धावा करणारा विराट कोहली दुसरा भारतीय खेळाडू झाला आहे. विराट कोहलीच्या नावावर जवळपास 1,100 धावांची नोंद झाली आहे. सचिन तेंडुलकर 2,278 धावांसह पहिल्या स्थानावर कायम आहे. सौरव गांगुली 1,006 धावांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. विराट कोहलीने विश्वचषकात सर्वाधिक झेल घेणारा भारतीय खेळाडू म्हणून मान मिळवला. विराट कोहलीने विश्वचषकाच्या 27 डावामध्ये 15 झेल घेतले आहेत. 2011 ते 2023 यादरम्यान विराट कोहलीचा हा चौथा विश्वचषक आहे. 27 सामन्यात विराट कोहलीने 15 झेल घेतले आहेत. अनिल कुंबळे याने 18 सामन्यात 14 झेल घेतले आहेत.